# महाराष्ट्र वनसेवा (पूर्व) परीक्षा-२०१७

## घोषणा

## जाहिरात क्रमांक (०४/२०१७)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ४ जून, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वनसेवा (पूर्व) परीक्षा-२०१७ चा निकाल दिनांक ८ **ऑगस्ट, २०१७** रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.**

**३. मुख्य परीक्षा दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी घेण्यात येईल.**

४.प्रस्तुत निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या **दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार विषयांकित गट-ब** पदासाठी विहित केलेली खेळविषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा अहवाल प्राप्त करणे अनिवार्य राहील. तद्नुषंगाने संबंधित खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राची विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेकडून तातडीने पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे.

५. प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्विकारार्ह ठरतील.

विजया पडते
उपसचिव,
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.मुंबई**

**ठिकाण:- मुंबई**
**दिनांक:- ८ ऑगस्ट, २०१७**